| ०९.०९.२०२५ | जा.क्र.२०२५/महसूल/नै.आ./कावि, दि.१०.०७.२०२५ सदरची संचिका ही माहिती अधिकार २००५ अधिनियम २२ नुसार मी आपल्याकडे दोन अर्ज दाखल केलेले होते, त्यात आपण मला दि.१०.०७.२०२५ ला नोटीस काढली व नंतर दोन वेळेस सुनावणी घेतले त्या अद्याप निर्णय दिला नाही, मला निर्णय व माझे केलेले अर्ज व नोटीस व प्रोसेडिंग व सर्वांचे जबाब व संपूर्ण संचिका नंबरिंग पेजींग करुन देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात विहित वेळेत कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही अनुसरण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या

मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह दि.**१३.०५.२०२६** रोजी वेळ दुपारी **०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.**२३.१०.२०२५** रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.3011 दिनांक :2/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २७५/२०२५
बोर्ड क्र.२०

श्री.कदम गिरीश विठ्ठलराव,
रा.गणपती मंदिराजवळ, पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (निवडणूक),
जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हा निवडणूक अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२०.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०८.२०२४ | ०१ एप्रिल २०२४ ते आजपर्यंत,<br>वरील कालावधीत संदिपान भुमरे नवनिर्वाचित खासदार छत्रपती संभाजीनगर यांनी लोकसभा निवडणूक लढवताना ऑनलाईन शपथपत्र (प्रतिज्ञापत्र) सोबत जे स्थावर जंगम व इतर मालमत्ता व्यवसाय दाखवला जे कागदपत्र निवडणूक अर्जासोबत दाखल केले त्या संपूर्ण कागदपत्रांचे छायांकित सत्यप्रती, |

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२८.१०.२०२४ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे संकेतस्थळाच्या पत्त्यासह अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे. सदर माहिती अपिलार्थी यांनी संकेतस्थळावर संपर्क करुन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२९.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सुनावणीचा आदेश न दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या

युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र त्यांनी आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचेव प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या प्रयोजनामध्ये आयोगास कोणताही तथ्यांश दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3531 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३१९७/२०२५
बोर्ड क्र.२२

श्री.उत्कर्ष दांडगे,
Utkrash.dandge@gmail.com — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१६.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०२.२०२५ | साथ मे जोडे गये पत्र क्रमांक AX१६/BOM/RTI/२०२४-२५/९ Date १३.०१.२०२५ श्री.मुकुंद कांबळे केंद्रीय जन माहिती अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र अंचलिक कार्यालय, महाबँक भवन, सी-३, एन-१, टाऊन सेंटर, छत्रपती संभाजीनगर पत्र के बारेमे सूचना प्रदान कारये--- |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थी यांना अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक

दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तहसिलदार, सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3528 दिनांक :- 13 | 2 | 2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
तहसिलदार, सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४७९६/२०२५**
**बोर्ड क्र.२५**

श्री.सुरेश धोंडिबा घोरपडे,
रा.पिंपरी राजा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.किरण मधुकर नारखेडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०७.२०२५ | अ.मौजे पिंपरी बु. ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट नंबर १८ मधील ७/१२ ला सुरेंद्र पिराजी बागडे,<br>ब.मौजे आडगाव खुर्द ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट नंबर २३, ३१४ मधील ७/१२ ला राजेंद्र पिराजी बागडे व सुरेंद्र पिराजी बागडे,<br>क.मौजे पिंप्री खुर्द ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील कट नंबर ५३, स्वप्नील राजेंद्र बागडे मौजे पिंप्री बुद्रुक गट नं.१६ सुरेंद्र पिराजी बागडे तसेच पांढरी पिंपळगाव येथील नंबर ३७ सुरेंद्र पिराजी बागडे,<br>वरील मिळकत ही पोट खराब मध्ये असताना ती वहितीमध्ये ज्या कागदपत्राआधारे व शासकीय आदेशाने घेण्यात आली त्या संपूर्ण कागदपत्रांच्या पूर्ण संचिकेची साक्षांकित प्रत देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास

दि.०१.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती कार्यालयाचे रजिस्टर तपासले असता आढळुन येत नसल्याचे व कार्यालयाकडे दाखल केलेल्या बाबीच्या अनुषंगाने पत्राची प्रत सादर केल्यास माहिती पुरविणे शक्य होईल, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सूचित केल्याप्रमाणे त्यांनी पत्राची प्रत कार्यालयास सादर केली नसल्यामुळे माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. या नंतर अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहिती अर्ज दि.३०.१०.२०२५ रोजीच्या पत्रासोबत तहसिल कार्यालयाकडे कलम ६ (३) नुसार वर्ग करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३०.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सुनावणी घेतली नाही व माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या प्राधिकरणाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या प्राधिकरणाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडे जास्तीत जास्त पाच दिवसात हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार मुदतीत हस्तांतरण झाले नसल्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जानुसार हवी असलेली माहिती अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडुन एकत्रित / संकलित करुन द्यावी लागेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित आहे ती कार्यालयाकडुन (तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर) अधिनियमातील कलम ५ (४) नुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती अपिलार्थीस, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रै १३।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3532 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४५५/२०२५
बोर्ड क्र.२८

श्री.विशाल तुकाराम गवळे, — अपिलार्थी
रा.घर क्र.१४-१-८७, पैठण रोड, विटखेडा, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.राजु मोरे, सहायक महसूल अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.१०.२०२४ | १. महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम अन्वये आपल्या अभिलेख विभाग असलेल्या अभिलेखांची वर्गवारी आणि सदरील अभिलेख जतन ठेवण्याची पध्दत, कालमर्यादा यांचा तपशिल तसेच सदरील अभिलेखांच्या वर्गवारीमध्ये येणाऱ्या संपूर्ण कागदपत्रांची यादी मिळावी,<br>२. महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियमातंर्गत आपल्या कार्यालयामध्ये ज्या वर्ष पासुनचे (अभिलेख) कागदपत्र जतन करुन ठेवले आहेत त्या वर्षाची नोंद माहिती मिळावी,<br>३. महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियमाच्या कलम ५ (१) नुसार अभिलेख अधिकारी यांचा तपशिल मिळावा,<br>४. महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियमानुसार अभिलेख नष्ट करण्याच्या कार्यपध्दतीची माहिती मिळावी,<br>५. नष्ट केलेल्या अभिलेख नोंद वहीचे अवलोकन करण्यासाठी मिळावे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

उपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-3533- दिनांक :-13/3/2026-नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १७८९/२०२५
बोर्ड क्र.२९

श्री.संदिप वसंतराव कुलकर्णी,
रा.समता नगर, सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.अरुण पंडुरे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०२.२०२५ | मी दि.२०.०२.२०२५ रोजी या अर्जासोबत अर्ज दिला, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम १५० (१) अन्वये फेर नोंद घेण्यास तलाठी सजा मुकुंदवाडी यांना आदेश देणेबाबत, अर्जासोबत आणखी काय कागदपत्रे जोडावी लागेल, दोनही अर्जास दिलेले आवक क्र. अभिलेखावर अर्ज किती तारखेस घेतला, आ.विनोदराव खिरोळकर यांनी दि.११.१२.२०२४ रोजी दफ्तर दिरंगाई पत्र अपर तहसिलदार यांना दिले, दि.०७.१०.२०२४ रोजी सीएमओ कक्ष यांनी पत्र दिले यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3534 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २०९५/२०२५
बोर्ड क्र.३०

श्री.बाळकृष्ण भागाजी जाधव,
रा.गट नंबर १४८५/४९, फ्लॅट नंबर एल-१/१, एल सेक्टर,
कासलीवाल तारांगण, मिटमिटा, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०२.२०२५ | सुभद्राबाई भ्र.किसनराव मोरे व गणेश पिता किसनराव मोरे यांच्या झालेल्या शेतीचे वाटणी प्रत व अर्जाची सत्यप्रत, गाव-पिंपळगाव (पां), गट क्र.३४, ता.जि.छत्रपती संभाजीनगर |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या सर्व बाबी विचारात घेता, या प्रकरणी त्रयस्थपक्षास त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येऊन त्रयस्थपक्षाने घेतलेली भूमिका व अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार होऊन माहिती अथवा माहिती संदर्भातील वस्तुस्थिती उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही होणे आयोगास आवश्यक वाटत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी,

अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीसंदर्भात संबंधित त्रयस्थपक्षास कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार बाजू मांडण्याची संधी देऊन त्यांनी घेतलेली भूमिका अथवा सादर केलेले लेखी निवेदन व अधिनियमातील तरतुदी विचारात घेऊन माहिती अथवा माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3534(अ) दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३४४३ ते ३४४५/२०२५ (०३)

ॲड.सागर बाबुराव शिंदे,
रा.शरणार्थ, एन-११, ई-१८/४, मयुरनगर, हडको,
छत्रपती संभाजीनगर
अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार ( महसूल-०१),
अपर तहसिल कार्यालय,छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.२

## (सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२३.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (म-१), श्री.अरुण पंडुरे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३६ | २४.०२.२०२५ | मौजे शेखापूर ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट क्रमांक ०६, या शेतजमिनीचा आदेश क्रमांक २०२३/जमा-२/सीआर/४१५ए दिनांक ०७.११.२०२३ रोजी सदरील प्रस्ताव मंजूर करतेवेळेस आपल्या कार्यालयामार्फत सदर संचिकेवर रोजनाम्याच्या अभिप्रायाच्या नोंदी नोंदवल्या आहेत त्या संपूर्ण संचिकेची छायांकित प्रत देण्यात यावी, |
| ३७ | २४.०२.२०२५ | मौजे शेखापूर ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट क्रमांक ०६, या शेतजमिनीचा आदेश क्रमांक २०२३/जमा-२/सीआर/४१५ए दिनांक ०७.११.२०२३ या पत्राची छायांकित प्रत मिळण्याबाबत तसेच सातबारा, टोच नकाशा, टिपण व इतर कायदेशीर कागदपत्राची परवानगी सादर केलेले आहे, त्याची छायांकित प्रत, |
| ३८ | २४.०२.२०२५ | मौजे शेखापूर ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट क्रमांक ०६, या शेतजमिनीचा आदेश क्रमांक २०२३/जमा-२/सीआर/४१५ए दिनांक ०७.११.२०२३ रोजी सदरील प्रस्ताव मंजूर करतेवेळेस आपल्या कार्यालयामार्फत सदर संचिकेवर रोजनाम्याच्या अभिप्रायाच्या नोंदी नोंदवल्या आहेत त्या संपूर्ण संचिकेची प्रत, |

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे ती अभिलेखात उपलब्ध नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०७.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांचे तीनही माहिती अर्ज तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडे कलम ६ (३) नुसार हस्तांतरित करण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, बेकायदेशीर माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या प्राधिकरणाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या प्राधिकरणाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडे जास्तीत जास्त पाच दिवसात हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार मुदतीत हस्तांतरण झाले नसल्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जानुसार हवी असलेली माहिती अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडुन एकत्रित / संकलित करुन द्यावी लागेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद तीन जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित आहे ती कार्यालयाकडुन (तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर) अधिनियमातील कलम ५ (४) नुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती अपिलार्थीस, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3535 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३६२०/२०२५
बोर्ड क्र.३९

श्री.सिद्दीकी मोहम्मद फसीयोद्दीन,
रा.अलामगीर मस्जिदसमोर, आलमगीर कॉलनी,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०५.२०२५ | श्री.फसीयोद्दीन कुतूबोद्दीन सिद्दीकी यांची जात प्रमाणपत्र क्र.५२७, दि.१४.०३.२००० रोजी दिलेला आहे, त्याची संपूर्ण संचिकेची सत्यप्रत, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर त्रयस्थपक्षास कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांना केवळ जात प्रमाणपत्राची प्रत देय होईल व उर्वरित माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित नसल्यामुळे उर्वरित माहिती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी,

अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी केवळ जात प्रमाणपत्राची प्रत (उर्वरित सर्व माहिती वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 3536 दिनांक :- 13|3|2026 -नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३९४४/२०२५**
**बोर्ड क्र.४०**

श्री.आनंद बन्सी साळवे,
रा.बंगला नंबर ६६, नेहरु पुतळा समोर, छावणी,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.अरुण पंडुरे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०५.२०२५ | आनंद बन्सी साळवे, माझे पुर्वज श्री.शहाजी हे दौलताबाद गावात वतनदार होते, माझ्याकडे एक शासकीय दस्तऐवज आहे, ज्यात त्यांच्या नावासमोर deleted असे लिहिलेलेआहे, जी जमीन सध्या वन विभागाच्या ताब्यात आहे, खालील माहिती पुरवावी,<br>१. श्री.शाहाजी यांचे नाव कोणत्या आदेशाने, कोणत्या कालावधीत वगळले गेले, त्याचा अधिकृत आदेशपत्र किंवा दस्ताऐवज सादर करावा,<br>२. ही जमीन वन विभागाकडे कोणत्या कायद्यानुसार आणि कधी वर्ग करण्यात आली, याबाबतची संपूर्ण प्रक्रिया, आदेश व पत्रव्यवहाराची प्रती सादर कराव्यात,<br>३. वतनदारांना त्यावेळी शासनाकडुन भरपाई मंजूर किंवा वितरित करण्यात आली होती का, असल्यास त्या संबंधित फायली, आदेश किंवा दस्तऐवज सादर करावेत,<br>४. शाहाजी यांच्या नावावर जमीन असल्याचे पुरावे दर्शवणारे अन्य शासकीय दस्ताऐवज रजिस्टर, पत्रक, वारस नोंदणी इ. सादर करावेत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना

आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगाकडील सुनावणी नोटीस सोबत अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झाला असुन या अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती प्राप्त झाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3355 दिनांक :- 11/8/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४६९९/२०२५
बोर्ड क्र.४१

श्री.सचिन एकनाथ खोतकर,
रा.एन-१२, एफ-३२, स्वामी विवेकानंद नगर, हडको,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१५.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०७.२०२५ | मायनिंग कामाची व रॉयल्टी तपासणी, जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीचा मायनिंग कामाची व रॉयल्टी तपासणी दि.३०.११.२०२४ ते दि.२४.०७.२०२५ मायनिंग परवाना दिला आहे का व रॉयल्टी तपशिल देणे, १.तेथील शेतकऱ्याची परवानगी घेतली आहे का, २. रस्त्याच्या दगडाचे खणन याची मायनिंग करत आहे नाही, ३.ग्रामपंचायतची परवानगी घेतली आहे का, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती

प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. मात्र अशा स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3537 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३७/२०२५
बोर्ड क्र.४२

श्री.बादशाह खान हिमायु खान,
रा.एस.आर.टी. नं.७०, लेबर कॉलनी, विश्वासनगर,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
पुरवठा निरीक्षक,
अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अन्न धान्य वितरण अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा पुरवठा निरीक्षक, श्री.ए.जे.वाहुळ उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी सुनावणीकरिता उशिराने उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.१०.२०२४ | पुरवठा निरीक्षक पांचाळ ज्ञानेश्वर दिनेश शिवाजीराव झांबळे यांच्या आय.डी. ऑनलाईनवरुन निर्गमित झालेले रेशनकार्डची माहिती दोन मुद्यांवर |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२०.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती शासनाचे संकेतस्थळ Mahafood व Maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन सदर संकेतस्थळावर संपर्क करुन माहिती हस्तगत करावी, असे अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली

नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे संकेतस्थळाच्या पत्त्यासह अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कळविले असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे संबंधित संकेतस्थळावर संपर्क करुन अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. जी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे ती कागदपत्र स्वरुपात देण्याची आवश्यकता नाही, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3538 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २४५/२०२५
बोर्ड क्र.४३

श्री.शेख शरिफ (लाला) शेख मुसा,
मुसा चौक, इंदिरानगर, बायजीपुरा, गल्ली क्र.३४,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
पुरवठा निरीक्षक,
अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अन्न धान्य वितरण अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१६.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा पुरवठा निरीक्षक, श्री.ए.जे.वाहुळ उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०८.२०२४ | मी यापूर्वी दि.२८.०२.२०२४ व दि.१६.०१.२०२४ ला औरंगाबाद शहरातील रास्तभाव दुकानदाराची मनमानी थांबवून उध्दटपणाने कार्डधारकांना वागणूक देत असल्याबाबत दिलेल्या निवेदनावर आपल्या कार्यालयाने आजपर्यंत जी काही कारवाई केलेली आहे त्या केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रत देण्यात याव्यात तसेच कार्यालयीन आदेश / पत्र काढले असतील तर त्या आदेश / पत्राची छायांकित प्रती देण्यात याव्यात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगाकडील सुनावणी नोटीस सोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर सदर अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना दि.११.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3515 दिनांक :- 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३३४६/२०२५
बोर्ड क्र.४४

श्री.सय्यद शकील सय्यद इब्राहिम,
रा.सांगळे गल्ली, हर्सूल, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
पुरवठा निरीक्षक,
अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अन्न धान्य वितरण अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२३.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा पुरवठा निरीक्षक, श्री.ए.जे.वाहुळ उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०७.२०२४ | १. मौजे हर्सुल दु.क्र.१५१ या दुकानाला कोण कोणते कार्ड आहे त्याची वर्गवारी,<br>२. हे दुकान संस्थेचे अध्यक्ष व सचिव स्वत: चालवितात की कुणाला चालविण्यास दिले,<br>३. दुकान निरीक्षक दुकानाला कधी भेट देतात,<br>४. एकुण रेशन कार्डची संख्या वर्गवारी,<br>५. दुकान निरीक्षक यांनी वेळोवेळी दुकानाला भेट दिली त्याचे भेटीचे विस्तृत माहिती,<br>६. संस्थेचे अध्यक्ष सचिव यांनी दुकान चालविण्यात येत असल्याचे शपथपत्र, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती अपेक्षित माहितीप्रमाणे नाही. त्यामुळे माहिती अर्जातील मागणी प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.३०.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती अभिलेखात उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपेक्षित माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3516 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ११७६/२०२५
बोर्ड क्र.४५

श्री.राहुल सुरेंद्र जैन,
रा.मातोश्री निवास, अन्वीकर पेट्रोलपंपासमोर, सिल्लोड,
ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०१.२०२५ | मी दि.०९.०१.२०२५ रोजी अर्ज कब्जा हटविलेबाबत दाखल केला तरी सुर्यभान महादू लहाने यास दिलेल्या नोटीसची प्रत मिळणे, कोणत्या ॲक्ट कलम अन्वये तहसिलदार अवैध कब्जा हटवतात माहिती मिळणे, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य

उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3517 दिनांक :- 13 | 3 | 2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ११७७/२०२५
बोर्ड क्र.४६

श्री.राहुल सुरेंद्र जैन, — अपिलार्थी
रा.मातोश्री निवास, अन्वीकर पेट्रोलपंपासमोर, सिल्लोड,
ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड,
ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.०१.२०२५ | मी कब्जा हटविणेबाबत दि.०६.०१.२०२५ रोजी प्रकरण एसडीएम सिल्लोड यांचेकडे दाखल केले तरी प्रकरणास पडलेला नंबर गैरअर्जदार यास दिलेल्या नोटीसची प्रत मिळणे, अभिप्राय मिळणे, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस

दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3518 दिनांक :- 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक ३९९/२०२५
बोर्ड क्र.५४

श्री. सय्यद इक्रमोद्दीन सय्यद करीमुद्दीन शुतारी,
रा.करीम कॉलनी, रोशनगेट, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.किरण मधुकर नारखेडे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०९.२०२४ | दिनांक ०१.०१.१९९८ ते दिनांक ३०.०१.१९९८ पर्यंतचे विरासत मंजुरी प्रकरणाबाबत दाखल झालेले प्रकरणाचे प्रकरण क्रमांक व प्रकरणातील अर्जदाराचे नावासहीत यादी मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशुन लिहिलेले दि.१९.११.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, परिपूर्ण माहिती मिळाली असल्याचे नमूद करुन प्रकरण बंद करण्यात यावे, अशी विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.१९.११.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 3519 दिनांक :- 13/3/2026 -नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२५३/२०२५
बोर्ड क्र.५५

श्री.संदिप वसंतराव कुलकर्णी, — अपिलार्थी
रा.समतानगर, सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.किरण मधुकर नारखेडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी आयोगाकडील रोजनाम्यावर स्वाक्षरी करुन प्रत्यक्षात सुनावणीकरिता अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०३.२०२५ | उपविभागीय अधिकारी छ.संभाजीनगर यांचेकडे दि.१८.०२.२०२५ रोजी दुसऱ्यांदा डिटेल कागदपत्रासह सुनावणी घेणेस कब्जा निश्कासित करणेस दिपक राजपाल लाहोर यास नोटीस काढणेस प्रकरण दाखल केले किती तारखेस अभिलेखावर घेतले दिपक लाहोर यास दिलेल्या नोटीसची प्रत वरील पत्त्यावर मिळणे, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, विभागीय आयुक्त महसूल मंत्री यांचेकउ्न आलेले एसडीएम ऑफिसला अर्ज पत्र यावर केलेल्या कार्यवाहीबाबद मामहिती मिळणे, सद्या प्रकरणाची स्थिती काय, मंत्री महसूल, मुख्यमंत्री सचिवालय, विभागीय आयुक्त यांचे मान्यतेने कार्यवाहीस आलेले पत्र दि.१८.०२.२०२५ रोजी दाखल फाईलला किती तारखेस जोडले, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.१८.०२.२०२५ रोजीचे कार्यालयास सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दि.०३.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयाकडुन समर्पक उत्तर देण्यात आलेले आहे. या नंतर सदर दि.१८.०२.२०२५ रोजीच्या निवेदनातील कार्यवाहीबाबतची माहिती अपिलार्थी यांनी प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही

बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3520 दिनांक :- 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०५१ व ३२०४/२०२५ (०२)

श्री.संतोष शंकरराव वाघलव्हाळे,
रा.चौका, ता.जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण / फुलंब्री, मुख्यालय,
देवगिरी कॉलेजच्या मागील बाजूस, शासकीय विद्यानिकेतन समोर,
अहिल्याबाई होळकर चौक, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण / फुलंब्री, मुख्यालय,
देवगिरी कॉलेजच्या मागील बाजूस, शासकीय विद्यानिकेतन समोर,
अहिल्याबाई होळकर चौक, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.०३.२०२५ व दि.१७.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.लक्ष्मण गरुड, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.बळीराम केकान, महसूल सहायक उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५६ | ०४.१२.२०२४ | जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम कायदा १९६९ (सुधारणा २०२३) च्या कलम १३ (३) प्रमाणे जन्म नोंद बाबतचे आपल्या कार्यालयाने दिनांक ०१.०१.२०२३ ते दि.०५.१२.२०२४ पर्यंत आपल्या कार्यालयात दाखल झालेले तालुका पैठण, तालुका फुलंब्री मधील संपूर्ण संचिकेतील एकूण प्रकरणातील आपल्या कार्यालयातील जाहिर प्रगटनानुसार सहा मुद्यांवर माहिती, |
| ५७ | ०३.०४.२०२५ | आपल्या कार्यालयात दाखल दि.--जून २०२४ मोजे बाभुळगाव बाबरा ता.फुलंब्री मधील जन्म नोंद कलम १३ (३) अन्वये दिलेल्या भिमराव मोरे हिच्या आदेशाची प्रमाणित प्रत देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.५६

मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे दि.२०.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेले आहे. बोर्ड क्र.५६ मधील प्रथम अपिलासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तसेच बोर्ड क्र.५७ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयाकडील निर्णय अंतिम झाला नसल्यामुळे व अशी माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता आलेली नाही. सदर बोर्ड क्र.५७ मधील प्रथम अपिलासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस तीन वेळेस बाजू मांडण्याची संधी देऊनही ते सुनावणीस उपस्थित राहिलेले नसल्यामुळे दि.०६.०८.२०२५ रोजीच्या निर्णयाव्दारे प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे. अत: अपिलार्थी यांच्या दोनही माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोनही प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी बोर्ड क्र.५७ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असुन या संदर्भात कार्यालयाकडील निर्णय अंतिम झाला नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणी दरम्यान अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांचा असा युक्तिवाद विचारात घेता, बोर्ड क्र.५७ मधील माहिती अर्जातील माहिती अपिलार्थी यांना देय होणार नाही. मात्र, अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.५६ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली अशी माहिती अपिलार्थीस अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण/फुलंब्री, मुख्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद बोर्ड क्र.५६ मधील जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण/फुलंब्री, मुख्यालय छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3521 दिनांक :- 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३८२८/२०२५
बोर्ड क्र.५९

श्री.राधाकृष्ण रामदास गायकवाड,
रा.रमाबाई कॉलनी, आमखेडा,
ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०४.२०२५ | कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण २०२४/ प्र.क्र.४५९/ई-१०, दिनांक १६.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये ज्या कोतवालांच्या सेवा संबंधित तलाठी सजा कार्यालय सोडून अन्य महसूली कार्यालयास संलग्न करण्यात येत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असल्यामुळे अशा महसूल विभागात (कार्यालयात) काम करणाऱ्या कोतवालांच्या सेवा संलग्नित न करता संबंधित कोतवालांना त्या त्या तलाठी सजा कार्यालयास त्वरीत वर्ग करण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे, त्या अनुषंगाने दोन मुद्यांवर माहिती, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित करुन देखील माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१४.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती अनेक विषयाशी संबंधित असल्यामुळे पहिल्या मुद्याची माहिती कार्यालयातून हस्तगत करावी व उर्वरित मुद्यांकरिता स्वतंत्र अर्ज सादर करणेबाबत अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी दि.०८.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3522 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५५११/२०२५
बोर्ड क्र.६०

श्री.सतिश मच्छिंद्रनाथ सांगळे,
रा.संत नामदेव नगर, जिजामाता शिक्षक कॉलनी, धानोरा रोड, बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
बीड, बाबुराव वाघ हाईट्स, ३ रा मजला, चाणक्यपुरी कमानीजवळ, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय उपआयुक्त,
महिला व बाल विकास, ज्युबलीपार्क चौक, पॅरामाऊंट मेडिकल स्टोअरच्या पाठीमागे, जिंदानी लॅब जवळ, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०१.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.अमोल पाटील, संरक्षण अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सोपान ढाकणे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०८.२०२५ | माझी पत्नी नामे सौ.योगेश्वरी सतीश सांगळे, योगेश्वरी शाहुराव जायभाये (रा.त्र्यंबकेश्वर कॉलनीजवळ, भक्ती कन्स्ट्रक्शन, एकनाथ नगर, बीड) यांनी माझ्याविरुध्द आपले कार्यालय / महिला तक्रार निवारण कक्ष / केंद्र, बीड येथे केलेली तक्रार अर्जाची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती पत्नीशी संबंधित असुन पत्नीकडुन घटस्फोट मिळण्याकरिता मा.न्यायालयाकडे रितसर दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याच्या अनुषंगाने पुरक माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती माहिती अधिकारातंर्गत मागणी करण्यात आलेली आहे. तथापि सदर माहिती अद्याप उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सदर मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्याच्या सबबीवरुन नाकारण्यात आलेली आहे. मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी

केलेली माहिती कार्यालयातील समुपदेशक यांचे संकलनाशी संबंधित असल्यामुळे सदर माहितीची दि.१२.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्यांचेकडे मागणी करुन या पत्राची प्रत अपिलार्थीस पृष्ठांकित करण्यात आलेली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने समुपदेशक यांनी सादर केलेली माहिती / वस्तुस्थिती दि.२८.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असुन मागणी केलेली माहिती गोपनिय स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अधिनियमातील तरतुदी विचारात घेऊन देय माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.२५.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, अधिनियमातील कलम ८ (१) (छ) विचारात घेता, महिला समुपदेशन केंद्राकडे महिलेने दिलेला अर्ज हा विश्वासहार्तेने दिलेला असल्यामुळे माहिती देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अधिनियमातील तरतुदी विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात दिलेल्या प्रतिसादामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3523 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १२०/२०२५
बोर्ड क्र.६१

डॉ.कैलास काशीनाथ पवार,
वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, भिंवडी, जि.ठाणे — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.प्रभाकर अंधोरीकर, पोलीस उपनिरीक्षक, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सुरेश थोरात, पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०५.२०२४ | वनिता राजे विरुध्द संकेत व सुनिल शिंदे बदनामी करित असलेबाबत तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा तपशिल, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहितीचा अर्ज पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी या कार्यालयाकडे सादर केला असुन मागणी केलेली माहिती उपविभागीय अधिकारी कार्यालय, गंगाखेड या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे सदरचा अर्ज पोलीस अधीक्षक कार्यालयाकडुन दि.०५.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये गंगाखेड उपविभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. सदर प्राप्त झालेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी सहायक जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, पो.स्टे., पिंपळदरी यांना माहिती सादर करणेबाबत कळविलेले आहे. तथापि सहायक जन माहिती अधिकारी यांच्याकडुन माहिती अप्राप्त असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे शक्य झालेले नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३१.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सहायक जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, पो.स्टे., पिंपळदरी यांच्याकडुन माहिती हस्तगत करुन अशी माहिती पंधरा दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांच्याकडुन माहितीची पुर्तता झाली

नसल्यामुळे माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे जन माहिती अधिकारी यांना शक्य झालेले नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३१.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, गंगाखेड, जि.परभणी यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र२॥६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3509 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३३९/२०२५**
**बोर्ड क्र.६२**

श्री.बालाजी रमाजी कांबळे, — अपिलार्थी
रा.केरवाडी आजमाबाद, ता.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस उपअधीक्षक (गृह),
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), श्री.अनिरुध्द सोपानराव काकडे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सुरेश थोरात, पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.१०.२०२४ | दि.११.०७.२०२४ रोजी तक्रार दिलेल्या संपूर्ण अर्जाची प्रत व तारखेवर तारीख झालेली प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती कलम ८ (१) (ज) नुसार नाकारण्यात येत असल्याचे कळविलेले आहे. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेल्या माहितीसंदर्भात चौकशी चालु असल्याने माहिती नाकारण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, त्रयस्थपक्षाचे जबाब वगळता उर्वरित माहिती १० दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. या नंतर दि.२७.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, उपलब्ध असलेली व देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर माहिती व वस्तुस्थिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन पोच दिलेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली सर्व

माहिती आज रोजी सोबत देखील आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी माहिती दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.3524 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३४३ ते ३४८/२०२५ (०६)

श्री.शेख खाजा जमील मोहियोद्दीन,
रा.दर्गा रोड, गालीब नगर, ईडण फंक्शन हॉल जवळ, परभणी : अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, परभणी शहर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२२.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये सहा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.बि.व्ही.झिंझुर्डे, पोलीस उपनिरीक्षक, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सुरेश थोरात, पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या सहा जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ६३ | २०.०८.२०२४ | दि.२९.०७.२०२४ रोजी मा.जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांच्यासमोर गुन्हा क्र.३५१/२०२४ नवा मोंढा पोलीस स्टेशन परभणीचा तपास आर्थिक गुन्हे शाखा परभणी यांच्याकडे हस्तांतरण / सुपुर्द करणेबाबत, अर्ज सादर केले होते, त्या अर्जावर आजपर्यंत केलेल्या कार्यवाही बाबत कागदोपत्री व लेखी अहवाल देण्यात यावे, |
| ६४ | २०.०८.२०२४ | दि.३१.०७.२०२४ रोजी मा.जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांच्या समोर गुन्हा क्र.३५१/२०२४ नवा मोंढा पोलीस स्टेशन परभणी मधील आरोपी क्र.१ ते ७ यांचे व त्यांच्या नातेवाईकांचे बँकेत असलेल्या बँक खात्याचे उतारे गोळा करुन त्यांचे बँक खाते तपासामध्ये Seize / Freeze जप्त करणेबाबत, अर्ज सादर केले होते, त्या अर्जावर आजपर्यंत केलेल्या कार्यवाही बाबत कागदोपत्री व लेखी अहवाल देण्यात यावे, |
| ६५ | १३.०८.२०२४ | दि.०७.०८.२०२४ रोजी मा.जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांच्यासमोर फिर्यादीने तत्कालीन समाज कल्याण अधिकारी नामे शिवानंद मिनगिरे जिल्हा परिषद परभणी यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हे नोंदविण्यासाठी कलम १९७ फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अन्वये मंजुरी मिळणेसाठी दिलेल्या परवानगी अर्ज गुन्हा क्र.३५१/२०२४ नवा मोंढा पोलीस स्टेशन परभणीच्या तपासामध्ये अभिलेखावर घेऊन गुन्हा क्र.३५१/२०२४ च्या तपासामध्ये तपासिक अधिकारी यांनी तत्कालीन समाज कल्याण |

| | | |
|---|---|---|
| | | अधिकारी नामे शिवानंद मिनगिरे, जिल्हा परिषद, परभणी यांना आरोपी म्हणून भर घालवणे व तसेच आरोपी म्हणून जोडणेबाबत तपासिक अधिकारी यांना आदेशित करणेबाबत, अर्ज सादर केले होता, त्या अर्जावर आजपर्यंत केलेल्या कार्यवाही बाबत कागदोपत्री व लेखी अहवाल देण्यात यावे, |
| ६६ | २०.०८.२०२४ | दि.१२.०८.२०२४ रोजी मा.जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांच्यासमोर गुन्हा क्र.३५१/२०२४ कलम ४०९, ४२०, ४६५, ४६८, ४७०, ४७१, १२० (ब), ३४ भा.द.सं. १८६० नवा मोंढा पोलीस स्टेशन परभणी मध्ये संबंधित तपासिक अधिकारी यांना समता जागृती ललित मंच, इकबाल नगर परभणी व तसेच या संस्थे अंतर्गत चालणारी शाळा साथ सोबत निवासी अस्थिव्यंग विद्यालय मानवत यांचे ऑडिट / फॉरेन्सीक ऑडिट / डिजीटल ऑडिट करण्यासाठी संबंधित तपासिक अधिकारी यांना आदेशित करणेबाबत, अर्ज सादर केले होते, त्या अर्जावर आजपर्यंत केलेल्या कार्यवाही बाबत कागदोपत्री व लेखी अहवाल देण्यात यावे, |
| ६७ | २०.०८.२०२४ | दि.०६.०८.२०२४ रोजी मा.जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांच्यासमोर गुन्हा क्र.३५१/२०२४ नवा मोंढा पोलीस स्टेशन परभणी मधील आरोपी क्र.१ ते ७ यांना तात्काळ अटक करणेबाबत, अर्ज सादर केले होते, त्या अर्जावर आजपर्यंत केलेल्या कार्यवाही बाबत कागदोपत्री व लेखी अहवाल देण्यात यावे, |
| ६८ | २०.०८.२०२४ | दिनांक २५.०७.२०२४ रोजी मा.जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांच्यासमोर गुन्हा क्र.३५१/२०२४ नवा मोंढा पोलीस स्टेशन परभणी मधील आरोपी क्र.१ ते ७ हे मला धमक्या देत असल्याबाबत, तक्रार दाखल केली होती, त्या तक्रारीवर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीबाबत कागदोपत्री व लेखी अहवाल देण्यात यावे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या बोर्ड क्र.६३ ते ६८ मधील सहाही माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी, अनुक्रमे दि.०४.१०.२०२४, दि.०४.१०.२०२४, दि.१३.०९.२०२४, दि.०४.१०.२०२४, दि.०४.१०.२०२४ व दि.०४.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः स्विकारुन पोच दिलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास नकार, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन, माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त सहा व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3526 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४२५/२०२५
बोर्ड क्र.६९

श्री.रामभाऊ सिताराम आंबुलकर,
रा.आर.एस.आंबुलकर, प्लॉट नंबर ०६, रमानगर ८५ प्लॉट एरिया, बेलत रोड, नागपूर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधीक्षक (गृह),
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२७.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), श्री.अनिरुध्द सोपानराव काकडे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सुरेश थोरात उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०८.२०२४ | पोलीस महासंचालक मुंबई यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी श्रीमती स्मिता नायर यांनी अर्जदाराला कळविले की, माहिती हवी असल्यास संबंधित जिल्ह्यातील जन माहिती अधिकारी यांना स्वतंत्र अर्ज करुन हवी असलेली माहिती उपलब्ध करुन घेणे योग्य होईल, असे कळविल्यामुळे आपल्या कार्यालयाकडुन माहिती देण्यात यावी, स्मिता नायर यांचे पत्र जोडले आहे, तरी खालील मुद्यांवर माहिती देण्यात यावी, जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनची एकत्रित माहिती देण्यात यावी,<br>१. कारोना काळातील गुन्हे वापस घेण्याबाबत दि.२०.०९.२०२२ चा शासन निर्णयासंबंधात आवश्यक कार्यक्षेत्रात दि.२१.०३.२०२० ते ३१.०३.२०२२ पर्यंत कोरोना काळात भा.द.वि. कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याची संख्या----<br>२. दि.२०.०९.२०२२ च्या शासन निर्णयानुसार गुन्हे परत घेतले असल्यास त्यांची संख्या--<br>३. गुन्हे परत न घेतलेल्या गुन्ह्यांची संख्या---<br>४. गुन्हे परत घेण्याविषयी आपल्या विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती |

| | |
|---|---|
| | कागदपत्रांसहित,<br>५. यानंतरही गुन्हे परत घेतले नसल्यास त्याची सर्व साधारण कारणे,<br>६. परत न घेतलेल्या गुन्ह्यांची सद्यस्थिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या अधिनस्त सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाशी संबंधित आहे. सदर मागणी केलेली माहिती सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाकडुन एकत्रित / संकलित करुन अशी माहिती अपिलार्थी यांना दि.०६.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, पूर्ण माहिती न देणे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3527 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४७७/२०२५
बोर्ड क्र.७०

श्री.निशीकांत प्रल्हादराव गुंडरे,
रा. सेरेन काउंटी सोसायटी, जी-२०२, वडगाव खुर्द, सिंहगड रोड,
पुणे
अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधीक्षक (गृह),
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी
: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३०.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), श्री.अनिरुध्द सोपानराव काकडे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सुरेश थोरात, पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०९.२०२४ | सेवानिवृत्ती नंतर सात वर्षाचे वेतन निश्चितीनंतर शासनाचे नियमाप्रमाणे व्याज आकारणी बाबत... |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.११.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१४.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन कागदपत्र स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.११.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, व्याजाची आकारणी होणेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये त्यांचेशी संबंधित सेवाविषयक बाबीसंदर्भात काही कार्यवाहीची अपेक्षा असल्याचे दिसुन येत आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3510 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६४०/२०२५**
**बोर्ड क्र.७१**

श्रीमती कमलाबाई बाबासाहेब कटारे,
रा.रामकृष्ण नगर, परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.बि.व्हि.झिंजुर्डे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सुरेश थोरात, पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.१२.२०२४ | दि.१९.१२.२०२३ रोजी आपल्या कार्यालयास दिलेला अर्ज तसेच त्या अर्जात विषयांकित केलेल्या कायदेशीर करणेबाबत विनंती केली आहे, त्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाकडुन जी कार्यवाही झालेली आहे त्याबाबत माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती नवा मोंढा पोलीस स्टेशनशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सदर पोलीस स्टेशनकडे माहितीची मागणी केलेली आहे. त्या नुसार संबंधित पोलीस स्टेशनकडुन प्राप्त झालेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.३१.०१.२०२५ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.१३.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याची बाब विचारात घेऊन, प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, निवेदनावर कार्यवाही करणेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२२.०१.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.१३.०२.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3508 दिनांक : 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९८१/२०२५
बोर्ड क्र.७२

श्री.मधुकर हिराजी मुळे,
रा.शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०७.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.प्रभाकर आंदोरीकर, पोलीस उपनिरीक्षक, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सुरेश थोरात उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०८.२०२४ | गंगाखेड तालुक्यातील मालेवाडी जवळील गंगोत्री आश्रमात महिला भक्तावर अत्याचार करणारे ज्ञानोबा मुगाजी कराळे उर्फ माऊली मुडेकर महाराजावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणे, |

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती गंगाखेड पोलीस स्टेशनशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी संबंधित पोलीस स्टेशनकडे माहितीची मागणी केलेली आहे. तथापि सहायक जन माहिती अधिकारी यांनी माहिती अथवा वस्तुस्थिती उपविभागीय कार्यालयाकडे वेळेत सादर केली नसल्यामुळे ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे जन माहिती अधिकारी यांना शक्य झालेले नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.११.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या सुनावणीच्यावेळी उपलब्ध अभिलेखावरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही गंगाखेड पोलीस स्टेशनशी संबंधित असल्याचे, सदर माहितीच्या अनुषंगाने गंगाखेड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.५०१/२०२४ कलम ३७६ (१), ३७७, ३५४ भा.दं.वि. नुसार गुन्हा नोंद असल्याचे, सदर गुन्ह्याचे दोषारोप पत्र मा.न्यायालयाकडे दाखल करण्यात आले असल्याचे व सदर गुन्ह्याचा कोर्ट केस आर.सी.सी. नं.१६३/२०२४, दि.०५.१०.२०२४ असा

असल्याचे आणि या परिस्थितीत अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना पुरविणे हे अधिनियमाच्या कलम ८ (१) (ख) नुसार विसंगत ठरत असल्यामुळे माहिती नाकारण्यात येत असल्याचे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती नाकारण्याच्या कारणाने, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे आयोगाच्या पटलावर सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रकरण मा.न्यायालयासमोर न्यायप्रविष्ठ असल्याचे दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२५.१०.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.११.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-3511- दिनांक :-13/3/2026-नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ११९४/२०२५
बोर्ड क्र.७३

श्री.मनोहर सुभाष भुजबळ,
रा.डॉ.आंबेडकर नगर, पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पूर्णा, जि.परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२१.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.प्रभाकर आंदोरीकर, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सुरेश थोरात, पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०१.२०२५ | १. माननीय अप्पर पोलीस अधीक्षक यांचे आदेश जावक क्रमांक ७८१३, दि.१०.१२.२०२४ अपिलार्थी यांचा सदरचा आदेश प्राप्त दिनांक ०१.०१.२०२५ च्या आदेशाने चुडावा पोलीस स्टेशन येथे दि.०४.०१.२०२५ रोजी सी.सी.टी.व्ही. फुटेज एक्सस्पर्ट सह पी.एस.चुडावा पोलीस स्टेशन येथे सी.सी.टी.व्ही. चेक करण्याकरिता गेले तेव्हा तेथील महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल, रेखा सुरनर म.पो.शि.१६५७ ह्या ०२ वा.०५मिनिटांनी पोलीस स्टेशन चुडावा येथे आले त्यांनतर तेथील हेड कॉन्स्टेबल रेखा सुरनर म.पो.शि.१६५७ ह्यांनी तेथील पी.एस.ओ. असलेले यांना स्टेशन डायरी नोंद घेण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये आलेले अपिलार्थी सोबत टेक्निशियन व प्रतिनिधी सह डायरीची नोंदची वेळे ०१.३५ दुपारी ते ०२.१० वा. ची प्रत प्रमाणित करुन द्यावी व इतर ४ मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती एकत्रित / संकलित करुन अपिलार्थी यांना दि.२१.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन

निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, मागणी केलेल्या माहितीसंदर्भात उपलब्ध अभिलेखांची पुन:श्च पडताळणी करुन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि अपिलार्थीस दि.२१.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीशिवाय दुसरी कोणतीही सुधारित माहिती अभिलेखात उपलब्ध नसल्यामुळे ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती अभिलेखात उपलब्ध आहे ती माहिती अपिलार्थीस प्रदान करण्यात आलेली असल्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आदेशाप्रमाणे माहिती पुरविली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरवा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3512 दिनांक :- 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १७९६/२०२५**
**बोर्ड क्र.७४**

श्री.सय्यद मुर्तुजा सय्यद जिलानी,
रा.शाहा ईनायत मोहल्ला, परभणी — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधीक्षक (गृह),
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १६.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), श्री.अनिरुध्द सोपानराव काकडे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सुरेश थोरात, पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०१.२०२५ | पोलीस अधीक्षक कार्यालयाचे पाठीमागे महानगरपालिका ते रेल्वेस्टेशनकडे जाणाऱ्या रोडवर दि.३१.१२.२०२४ वेळ १६.५० ते १७.५५ पर्यंतचा व्हिडीओ रेकॉर्डिंग व फुटेज देण्यात यावे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा तांत्रिकदृष्ट्या बंद असल्यामुळे माहिती पुरविता येत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१२.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात उपलब्ध अभिलेखांची पुन:श्च पडताळणी करुन माहिती अपिलार्थीस १० दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन उपलब्ध अभिलेखांची पुन:श्च शहानिशा केली असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे

अपिलार्थी यांना दि.०७.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रकाश

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3513 दिनांक :- 13/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे